# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. लालसिंग एकनाथ लमाण ,<br>रा. निगडी बु. , ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

कोरम :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. लालसिंग एकनाथ लमाण , रा. निगडी बु. ,ता. जत, जि. सांगली यांनी आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा वितरण कंपनीच्या संख उप विभागाकडे दि. ५.१२.२००८ अर्ज रोजी केला. त्यासाठी भरावी लागणारी फी रु. ५०/– पावती क्र. ४३०२४०९ नुसार भरली आहे. वितरण कंपनीने त्यांना चलन क्र. १३२५ दि. ४.१२.२००९ रोजी दिले आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ३.२.२०१० रोजी तक्रार केली. परंतु नक्की रक्कम किती व केव्हा द्यावी हे स्पष्ट ठोसपणे कळविले नाही. म्हणून तक्रारदार यांनी ग्राहक तक्रार निवारण मंचासमोर दि. १६.४.२०१० अर्ज देवून अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळणे बाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १४.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचा अर्ज दि. ५.१२.२००८ रोजी मिळाल्याने मान्य केले आहे व त्यांस दि. ४.१२.२००९ रोजी चलन देण्यात आलेले आहे, ते त्यांनी दि. २१.१२.२००९ भरलेले आहे. तक्रारदार यांनी दि. २३.१२.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला असून त्यांना कनेक्शन दि. २०.३.२०१० रोजी देण्यात आले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १८.५.२०१० ला सुनावणीसाठी ठेवली असतां, तक्रारदार व प्रतिनिधी श्री. खापरे गैंरहजर. वितरण कंपनीतर्फे श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता व श्री. मैंलापुरे, कनिष्ठ अभियंता, संख उप विभाग, श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. वि.प.तर्फे सांगण्यात आले की, तक्रारदाराचा अर्ज अपूर्ण होता म्हणून त्यांना पत्र क्र. ३३५१ दि. ६.६.२००९ ने कळविण्यात आले व दि. २३.९.२००९ रोजी त्यांनी पूर्तता केली. यामुळे दि. २३.९.२००९ रोजी कागद पूर्ण झाल्यामुळे तो पर्यंत विलंब नाही असे प्रतिपादन केले. तसेच जादा म्हणणे देणार व १ एल.टी.पोलचे काम आहे असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी मंचाला अग्रेषित केलेले पत्र मंचासमोर दि. ९.६.२०१० ला वि.प.तर्फे सादर करण्यात आले. त्या पत्रात तक्रारदार यांनी चलन मिळाले आहे, मला नुकसान भरपाई नको असे म्हटले आहे व अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे.

वितरण कंपनीतर्फे आपल्या दि. १४.५.२०१० च्या अहवालात विलंबा बाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. वि.प. च्या कवठे महांकाळ विभागाने दि. ६.६.२०१० ला तक्रारदार यांस ७/१२ चा उतारा सादर करण्याबाबत कळविले आहे. प्रस्तुत पत्राचा संदर्भ पहाता, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग यांचे पत्र क्र. ६२० दि. ५.३.२००९ नुसार सदरचे पत्र दिल्याचे स्पष्ट होते. सदर प्रकरणाच्या सुनावणीस तक्रारदार किंवा प्रतिनिधी हजर नसल्यामुळे अशा पत्राबद्दल किंवा ७/१२ उतारा हजर न करणे बाबत कांही खुलासा तक्रारदारातर्फे होवू शकला नाही. त्यामुळे दि. १८.५.२०१० च्या म्हणण्या प्रमाणे तक्रारदार यांनी दि.२३.९.२००९ रोजी ७/१२ हजर केला असे मानले तरी दि. २३.९.२००९ नंतर १ महिना म्हणजे दि.२३.१०.२००९ या कालावधीत चलन देण्यात आले नाही ते दि. ४.१२.२००९ ला म्हणजे जवळजवळ ६ आठवड्यानंतर देण्यात आले आहे. त्या विलंबाबद्दल वि.प.तर्फे कांही खुलासा केलेला नाही. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, वि.प.ची कार्यवाही कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार झालेली नाही, कृती मानकाचा भंग झाला आहे. त्यामुळे ६ आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ६००/– इतकी भरपाई तक्रारदारास देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. परंतु तक्रारदार यांस दि. २०.३.२०१० रोजी कनेक्शन देण्यात आलेले आहे, परंतु मंचाला अग्रेषित केलेल्या दि. ५.६.२०१० च्या अर्जात तक्रारदाराने त्याचा कांही खुलासा केलेला नाही. असो. तक्रारदाराने तक्रार मागे घेत आहे, नुकसान भरपाई नको हे स्पष्टपणे म्हटले आहे, त्यामुळे प्रस्तुतची तक्रार निकाली काढणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराचे मंचाला अग्रेषित केलेले दि. ५.६.२०१० चे पत्र मंचात दि. ९.६.२०१० रोजी प्राप्त झाले, त्यानुसार तक्रार मागे घेतली असल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :